**नियमित फौजदारी खटला क्रमांक ०५/२०१५ मधील निशाण २८ वरील आदेश**

१. फिर्यादी श्री. संजय नारायण होनराव यांनी हा अर्ज त्यांचे मालकीची चोरीस गेलेली हिरो होंडा सीडी डिलक्स एम.एच. ११ ए.व्ही. १८५५, कि जी मोटर सायकल रहिमतपूर पोलिस स्टेशन यांनी श्री.मेहबूब बाबूभाई शेख रा.एकसळ, पो.शिरंबे, ता.कोरेगांव, जि.सातारा यांना रक्कम रु.१८,०००/- (रुपये अठरा हजार मात्र) चे मोबदल्यात लिलावाने विक्री केली आहे, ती मोटर सायकल याकामी जप्त करणेबाबत आदेश होऊन मिळणेसाठी व लिलावाची रक्कम न्यायालयात जमा करणेबाबत दाखल केला आहे.

२. या अर्जाचे कामी पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस स्टेशन यांचे म्हणणे मागविण्यात आले होते. त्याप्रमाणे सहाय्यक पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी निशाण ३४ वर आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांचे म्हणण्यातील कथनांप्रमाणे डिसेंबर २०१४ मध्ये त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये मोटर सायकल नं.एम.एच. ११ ए.व्ही. १८५५ ही बेवारस मिळून आली. त्याबाबत त्यांनी मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा, मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर व मा.व्यवस्थापक, न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी, सातारा यांचेकडे चौकशी केली. परंतु, त्या वाहनाची नोंद मिळून आली नाही. त्यांनी रितसर प्रक्रिया पूर्ण करुन ही मोटर सायकल मेहबूब बाबूभाई शेख यांना जाहीर लिलावाने विक्री केली आहे व लिलावाची रक्कम शासन जमा केली आहे.

३. सहाय्यक सरकारी वकील सौ.एस.एस.यादव यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, आर.सी. बुक वरुन ती मोटर सायकल फिर्यादी संजय होनराव यांचे नावे असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. याकामी ही मोटर सायकल पुराव्याचा भाग आहे. रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी केलेला लिलाव हा वस्तुस्थितीची शहानिशा न करता केलेला होता, असे दिसून येते. सबब, याकामी योग्य ते आदेश करणेत यावेत, अशी विनंती सहाय्यक सरकारी वकील यांनी केली आहे.

४. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

५. उभय पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

६. फिर्यादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे दि.०१.०२.२०१४ रोजी रात्री १०.०० वाजता आरोपी व इतर तीन अनोळखी इसमांनी त्यांना त्यांची मोटर सायकल नं. एम.एच. ११ ए.व्ही. १८५५ वरुन पोलिस असल्याचे भासवून साळशिंगे रोडला नेऊन मारहाण केली व त्यांची मोटर सायकल व मोबाईल चोरुन नेले. त्यामुळे, त्यांनी आरोपी यांचेविरुध्द विटा पोलिस ठाणे येथे फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादी यांचे कथनांप्रमाणे ती मोटर सायकल त्यांचे मालकीची आहे. तपासिक अंमलदार यांनी याकामी दोषारोप सोबत दाखल केलेल्या आर.सी. बुकची प्रत पाहता ही मोटर सायकल फिर्यादी यांचे मालकीची असल्याचे दिसून येते.

७. सहाय्यक पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांचे निशाण ३४ वरील म्हणण्यातील कथनांप्रमाणे त्यांना ही मोटर सायकल त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये बेवारस मिळून आली व त्यांनी त्या मोटर सायकलचे मालकाबाबत चौकशी करुनही त्यांना मालकाचे नाव व पत्ता न मिळाल्याने त्यांनी रितसर प्रक्रिया पूर्ण करुन ही मोटर सायकल मेहबूब बाबूभाई शेख यांना रक्कम रु.१८,०००/- चे (रुपये अठरा हजार मात्र) मोबदल्यात जाहीर लिलावाने विक्री केली आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी केलेली ही कथने, त्यांनी जाहीर लिलावा बाबतची सादर केलेली कागदपत्रे व फिर्यादी यांनी निशाण ३० सोबत सादर केलेली कागदपत्रे यांचे एकत्रात अवलोकन केले असता फिर्यादी यांनी त्यांचे अर्जामध्ये त्यांच्या मालकीची मोटर सायकल रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी रक्कम रु.१८,०००/- चे (रुपये अठरा हजार मात्र) मोबदल्यात मेहबूब बाबूभाई शेख यांना विक्री केली आहे, असे जे कथन केले आहे, त्या कथनांमध्ये तथ्य दिसून येते.

८. सहाय्यक पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी या मोटर सायकलीच्या मालकाबाबत चौकशी केल्याचे कथन केले असले तरी त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता त्यांनी निव्वळ उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पत्रव्यवहार करणे व्यतिरिक्त काहीही केलेचे दिसून येत नाही. त्या पत्रांचे नेमके उत्तर काय आले, हे देखील सहाय्यक पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये नमूद केलेले नाही अगर त्याबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही. सहाय्यक पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी व्यवस्थापक, न्यू इंडिया कंपनी लि. कार्यालय, सातारा यांचेकडे या मोटर सायकलीबाबत पत्रव्यवहार केल्याचे व त्या अनुषंगाने त्या मोटर सायकलीचा विमा या कंपनीकडे घेतला गेला नसल्याचे न्यू इंडिया कंपनी लि. कार्यालय, सातारा यांचे संबंधित अधिकारी यांनी कळविल्याचे दिसून येते. सहाय्यक पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी अन्य कोणत्याही विमा कंपनीकडे चौकशी केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये केलेली कथने व सादर केलेली कागदपत्रे पाहता त्यांनी या मोटर सायकलीचे मालकाबाबत योग्य तो शोध घेतला नसल्याचे स्पष्ट दिसून येते.

९. प्रस्तुतचे प्रकरण फिर्यादी संजय नारायण होनराव यांची मोटर सायकल व मोबाईल चोरीबाबत आहे. तपासिक अंमलदार यांनी याकामी कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नाही व या प्रकरणी सादर केलेला नाही. वर नमूद केलेप्रमाणे फिर्यादी यांची चोरीला गेलेली मोटर सायकल नं. एम.एच. ११ ए.व्ही. १८५५ ही रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी मूळ मालकाबाबत योग्य ती चौकशी न करता जाहीर लिलावाने रक्कम रुपये १८,०००/- चे (रुपये अठरा हजार मात्र) मोबदल्यात मेहबूब बाबूभाई शेख रा.एकसळ, पो.शिरंबे, ता.कोरेगाव, जि.सातारा यांना विक्री केल्याचे दिसून येते. या प्रकरणातील आरोपींविरुध्द

ठेवणेत आलेला दोषारोप पाहता फिर्यादी यांची हिरो होंडा सीडी डिलक्स एम.एच. ११ ए.व्ही. १८५५ ही या प्रकरणी मुद्देमाल म्हणून जप्त करणे व सहाय्यक पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी लिलावाची रक्कम रुपये १८,०००/- (रुपये अठरा हजार मात्र) न्यायालयात जमा करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे:-

**आ दे श**

१. फिर्यादी यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. पोलिस निरीक्षक, विटा पोलीस स्टेशन व पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी मेहबूब बाबूभाई शेख रा.एकसळ, पो.शिरंबे, ता.कोरेगांव, जि.सातारा यांचे ताब्यातून फिर्यादी यांचे मालकीची चोरीला गेलेली हिरो होंडा सीडी डिलक्स एम एच ११ एव्ही १८५५ ही मोटर सायकल योग्य ती प्रक्रिया अवलंबून जप्त करावी व या प्रकरणी मुद्देमाल म्हणून सादर करावी.

३. पोलिस निरीक्षक, रहिमतपूर पोलिस ठाणे यांनी शासन जमा केलेली लिलावाची रक्कम रुपये १८,०००/- (रुपये अठरा हजार मात्र) न्यायालयात एक महिन्याच्या आत जमा करावी.

४. श्री. मेहबूब बाबूभाई शेख रा.एकसळ, पो.शिरंबे, ता.कोरेगांव, जि.सातारा यांचे हक्क अबाधित राहतील, असे देखील याद्वारे स्पष्ट करणेत येत आहे.

-

Digitally signed by Dhiraj Maruti Hinglajkar
Date: 2019.10.10 16:51:31 +0530

**दिनांकः०९/१०/२०१९** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, विटा.**

**ता.खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCC No. 05 of 2015
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer : V.A.Mane
Court Name: 2nd Jt.Civil & Criminal Court, Vita, Dist-Sangli.
Date of decision :09/10/2019
Order signed by P.O.on : 09/10/2019
Order uploaded on :09/10/2019